RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६१

दि. २५ जून २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महामृत

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# महा-एआय मॉडेलद्वारे डेटा - आधारित प्रशासन उभारण्याच्या दिशेने शासनाचे महत्त्वाचे पाऊल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महासारथी,महाडीबीटी २.०, डिजिटल हयातीचा दाखला आणि राज्याच्या महा एआय मॉडेलचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई/प्रतिनिधी :** नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करण्यासाठी राज्य शासन सातत्याने तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. राज्याच्या एआय मॉडेलद्वारे ज्ञानाधारित आणि डेटा-आधारित प्रशासन उभारण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. या नवीन उपक्रमांमुळे राज्यातील नागरिकांना शासकीय सेवा अधिक वेगाने, सुलभतेने आणि पारदर्शकपणे उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विधानभवन येथे महासारथी, महाडीबीटी २.०, सेवा केंद्रांचे मानकीकरण, डिजिटल लाईफ सर्टिफिकेट आणि राज्याच्या एआय मॉडेलच्या लोकार्पणप्रसंगी बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश




अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, व्ही. सी.द्वारे, सर्व विभागीय आयुक्त, सर्व पोलीस महानिरीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व जिल्हाधिकारी, सर्व आयुक्त महानगरपालिका, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व पोलीस अधीक्षक बैठकीला उपस्थित होते. यावेळी लाभार्थी मधुकर मोरे व वत्सला पाटील यांना हयातीच्या दाखल्याचे वितरण करण्यात आले.

**महासारथीमुळे योजनांची अचूक अंमलबजावणी शक्य**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महासारथी अंतर्गत तयार करण्यात आलेला एकात्मिक डेटा पूल केवळ शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठीच उपयुक्त ठरणार नाही, तर भविष्यातील योजना तयार करणे, त्यांचे नियोजन करणे आणि लक्ष्यित पद्धतीने अंमलबजावणी करणे यासाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.या प्रणालीमुळे लाभार्थ्यांचे डुप्लिकेशन टाळणे, योजनांतील गैरवापर ओळखणे आणि पात्र नागरिकांना कोणत्याही अडथळ्याशिवाय योजनांचा लाभ मिळवून देणे शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**जीआरपी प्रणालीमुळे अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ**

नागरिकांना विविध योजनांसाठी अर्ज करताना भराव्या लागणाऱ्या माहितीची संख्या कमी होत आहे. शासनाच्या डेटा पूलमधील उपलब्ध माहिती स्वयंचलितपणे अर्जामध्ये समाविष्ट होत असल्याने नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत. भविष्यात एजंटिक एआयचा वापर वाढल्यानंतर ही प्रक्रिया आणखी सुलभ आणि वेगवान होईल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

**महाडीबीटी २.० : सर्व योजना एका व्यासपीठावर**

महाडीबीटी २.० हे राज्य शासनाचे अत्यंत महत्त्वाचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. महाडीबीटीच्या पहिल्या आवृत्तीमध्ये सर्व योजना समाविष्ट करता आल्या नव्हत्या. मात्र नव्या प्रणालीद्वारे सर्व विभागांच्या योजना एकाच व्यासपीठावर आणता येणार आहेत. यासंदर्भात सर्व विभागांनी निश्र्चित मुदतीत महाडीबीटी २.० वर स्थलांतर करावे, अन्यथा जुन्या प्रणालीवरील योजनांची उपलब्धता बंद करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**शिष्यवृत्ती वितरणासाठी डीबीटी प्रभावी**

पूर्वी शिष्यवृत्ती योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याची आठवण करून देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डीबीटी प्रणालीमुळे पारदर्शकता वाढली असून शासनाचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात टळले आहे. सर्व योजना डीबीटीवर आल्यानंतर लाभ थेट पात्र नागरिकांपर्यंत पोहोचेल आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल.

**सेवा केंद्रांचे मानांकीकरण काळाची गरज**

राज्यातील आपली सेवा केंद्रे ही नागरिकांसाठी शासनाचा

>> पान ३

## मुंबई येथील 30 जून च्या मोर्चामध्ये चर्मकार समाजाने हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे - रवि कुरील

**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी समितीच्या वतीने मुंबई येथे सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेब, राजकुमार बडोले माजी मंत्री तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे ३० जून रोजी महामोर्चाच्या आयोजन करण्यात आले आहे या मोर्चामध्ये अनुसूचित जातीतील सर्व जातीचे प्रमुख नेते सहभागी होणार आहेत.

या मोर्चासाठी लातूर जिल्ह्यातील चर्मकार समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी के मुरळी कर राज्य उपाध्यक्ष डॉ संतोष वाघमारे, ज्येष्ठ नेते राजकुमार बनसुडे,जिल्हाध्यक्ष रवी कुरील जिल्हा कार्याध्यक्ष अनिल कबाडे जिल्हा सचिव डॉ नरसिंग वाघमोडे गटई कामगार जिल्हा अध्यक्ष नंदकुमार बनसोडे गटई कामगार ज्येष्ठ नेते नेताजी राऊत परमेश्वर कांबळे दीपक हेळकर बालाजी जाधव औसा तालुकाध्यक्ष रवी भावले कार्याध्यक्ष अनिल कांबळे शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष गणेश सा वळकर जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र साबळे मुरुड शहराध्यक्ष सुजित साबळे, बालाजी शेरखाने आदींनी केले आहे.

## ज्येष्ठ समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे यांची आज श्रध्दांजली सभा

**लातूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी गुरुवार, २५ जून २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता, हॉटेल अंजनी, छ. शिवाजी महाराज चौक, येथे शोकसभा आयोजित केली आहे.



त्यांचे नुकतेच निधन झाले. एक अभ्यासू राजकारणी असा त्यांचा लौकिक होता. ते माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांचे निकटवर्तीय मानले जात. लातूरच्या सामाजिक, राजकीय जडनघडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. विविध पुरोगामी संघटनामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. राज्यभर त्यांचा मित्र परिवार होता. विविध संस्था, संघटना यांच्या वतीने ही सभा होणार आहे. सभेत सहभागी होण्याचे आवाहन, जी २४, बाबासाहेब परांजपे फाउंडेशन,नारी प्रबोधन मंच, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, चैतन्य हास्य मंडळ, राष्ट्र सेवा दल, लातूर कलामंच, माणूस प्रतिष्ठान, हरीती वाचक चळवळ, लातूर वृक्ष चळवळ यांनी केले आहे.

## लग्नापूर्वीच सिया गोयलला सासूची वॉर्निंग, तुला एकाही पार्टीला पाठवणार नाही, आमच्या घरात ड्रिंकिंग अलाऊड नाही

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा केतन अग्रवाल याची १८ जून रोजी लोहगडावरील दरीत ढकलून देऊन हत्या करण्यात आली. केतन अग्रवाल याची होणारी पत्नी सिया गोयल हिनेच तिचा प्रियकर चेतन चौधरी याच्यासोबत कट रचून केतनची हत्या केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. ही घटना उघड झाल्यानंतर पुण्यासह राज्यभरात एकच खळबळ उडाली.

## एमआयटी, लातूर येथे शुक्रवारी भारतीय किसान संघाचा भव्य शेतकरी मेळावा

### पद्मश्री कृषी संशोधक डॉ. श्रीरंगदादा लाड यांचे मार्गदर्शन; शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर होणार मंथन

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय किसान संघ, लातूर जिल्हा यांच्या वतीने शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता अंबाजोगाई रोडवरील विश्वनाथपुरम येथील एमआयटी शिक्षणसंस्था संकुलातील संत श्री ज्ञानेश्वर महाराज डोम येथे भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा होणार आहे. शेतरस्ते, पाणंद रस्ते, वीज उपलब्धता आणि बारमाही पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी लोकप्रतिनिधी, शासन आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधून संबंधित योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून पद्मश्री सन्मानप्राप्त कृषी संशोधक डॉ. श्रीरंगदादा लाड उपस्थित राहणार आहेत. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना केंद्र शासनाचा पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला आहे. विषमुक्त शेती, ज्वारी, गहू, कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांच्या उत्पादनवाढीसाठी त्यांनी केलेले संशोधन तसेच 'दादा लाड तंत्रज्ञान' म्हणून मान्यता प्राप्त तंत्रज्ञानाबाबत ते शेतकऱ्यांना




मार्गदर्शन करणार आहेत.

मेळाव्याचे उद्घाटन वारकरी संप्रदायातील आदरणीय व्यक्तिमत्त्व, एमआयटी समूहाचे विश्वस्त तथा रामेश्वर गावाचे माजी सरपंच तुळशीरामअण्णा कराड यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रगतिशील शेतकरी काशीरामनाना कराड, भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, जिल्हामंत्री सतीश देशपांडे (तावशीकर) तसेच एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूरचे संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

मेळाव्यात रानडुक्कर, हरीण व इतर वन्यप्राण्यांमुळे शेतीपिकांचे होणारे नुकसान रोखण्यासाठी शासनाकडून प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे, तसेच नुकसानभरपाई तातडीने मिळावी यासाठी कार्ययोजना आखण्यावर भर दिला जाणार आहे. मार्केटयार्डमध्ये शेतकऱ्यांकडून अनधिकृतपणे घेतली जाणारी धान्य कपात तसेच फळ व फुल बाजारातील आडत प्रथा बंद करण्यासाठीही संघटना पाठपुरावा करणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

याशिवाय शेतीमालाच्या किमान आधारभूत किंमती ठरविण्याच्या विद्यमान पद्धतीत बदल करून शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या वाढीप्रमाणे शेतीमालाच्या किंमतीत वाढ व्हावी, यासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांचे सक्षम व मजबूत संघटन उभे करण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे.

लातूर व रेणापूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय किसान संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लातूरमध्ये २६ जून रोजी सामाजिक न्याय दिनानिमित्त समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** राजर्षि छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सदैव दक्ष होते आणि समाजातील दुर्लक्षित, मागासवर्गीय, दिव्यांग, वृद्ध, निराधार व दुर्बल घटकांच्या प्रती त्यांचा दृष्टिकोन विशेष सहानुभूतीचा व सुधारणावादी होता. त्यांनी या घटकांच्या कल्याणार्थ अनेक निर्णय अंमलात आणले. शाहू महाराजांचा हाच आदर्श समाजापुढे विशेषत्वाने यावा या दृष्टिकोनातून त्यांचा जन्मदिवस २६ जून हा प्रतिवर्षी 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. लातूरमध्येही यानिमित्ताने २६ जून रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने २६ जून २०२६ रोजी सकाळी ७.४५ ते ८.४५ या वेळेत राजर्षि छत्रपती शाहू महाराज पुतळ्यापासून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले असून, या पायी प्रभातफेरीचा मार्ग राजर्षि छत्रपती शाहू महाराज पुतळा-लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौक-गंजगोलाई-महात्मा गांधी चौक असा राहील आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे या प्रभातफेरीचा समारोप करण्यात येईल.

या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीच्या माध्यमातून नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जनजागृती करण्याच्या दृष्टीने संविधानातील कायद्यासमोर समानता, भेदभाव प्रतिबंध, अस्पृश्यता प्रतिबंध, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे अधिकार व कर्तव्ये या विविध अनुच्छेदांची तसेच अस्पृश्यता निर्मूलनाची माहिती घोषणावाक्यांच्या माध्यमातून दिली जाणार आहे. तरी २६ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ७.३० वाजता राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यासाठी, तसेच या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीत बहुसंख्येने सहभागी होण्यासाठी लातूर येथील शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी राजर्षि शाहू महाराज पुतळा येथे उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## 100 मिमी पाऊस आणि जमिनीत ६ इंच ओल झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये; जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जून महिना आता शेवटच्या टप्प्यात आला असला, तरी लातूर जिल्ह्यात अद्याप पुरेशा प्रमाणात पावसाचे आगमन झालेले नाही. आजपर्यंत जिल्ह्यात केवळ ५१.७ मिलीमीटर एवढ्याच पावसाची नोंद झाली असून, जमिनीमध्ये पेरणीसाठी आवश्यक असलेली ओल तयार झालेली नाही. या पार्श्वभूमीवर, जोपर्यंत जिल्ह्यात किमान १०० मिलीमीटर पाऊस पडत नाही आणि जमिनीमध्ये ६ इंचांपर्यंत ओल जात नाही, तोपर्यंत शेतकरी बांधवांनी घाईघाईने पेरणी करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे. अपुऱ्या पावसावर पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते, त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेऊन आणि जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्यावरच पेरणीचा निर्णय घ्यावा, असे कृषी विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'अमृत मानस मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था 'अमृत'च्या वतीने 'अमृत मानस मित्र' समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था 'महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था', पुणे ही तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे.

मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, क्टिव्ह लिसनिंग, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मानससामाजिक सहाय्य या विषयांवर आधारित असलेल्या या अभिनव उपक्रमांतर्गत सहभागी उमेदवारांना प्रत्यक्ष कार्यक्षम समुपदेशक म्हणून विकसित करण्यावर भर देण्यात आला असून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना 'अमृत' व 'एमआयएमएच' यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कौशल्याधारित शिक्षण, समाजाभिमुख प्रशिक्षण आणि रोजगार क्षमतेवर आधारित असलेल्या या मोफत प्रशिक्षणाचे स्वरूप पुणे येथे प्रथम १५ दिवसांचे ऑफलाइन प्रशिक्षण, इंटरक्टिव्ह सेशन्स, केस स्टडीज, प्रॅक्टिकल क्टिव्हिटीज आणि तज्ञांचे मार्गदर्शन असे असेल; ज्यानंतर जिल्हा पातळीवरील शाळा-महाविद्यालयांशी जोडून एक महिना प्रॅक्टिकल फिल्ड एक्सपोजर दिले जाईल आणि पुढील ३ ते ५ महिने प्रत्यक्ष व्यवसायासाठी 'एमआयएमएच'च्या तज्ञांद्वारे नियमित ऑनलाईन सत्र, केस डिस्कशन, मेंटोरिंग आणि व्यावसायिक मार्गदर्शनासह कौशल्य वृद्धीसाठी सतत पाठबळ दिले जाईल.

या प्रशिक्षणासाठी एम.ए./एम.एससी. मानसशास्त्र, एम.ए./एम.एससी. समुपदेशन मानसशास्त्र किंवा मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदव्युत्तर पदवी असलेले 'अमृत'च्या लक्षित गटातील पात्र उमेदवार अर्ज करू शकतात, ज्यामध्ये या क्षेत्रात पूर्वीपासून कार्यरत व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असले तरी प्रशिक्षणासाठी आवश्यक निवास, भोजन व राहण्याची व्यवस्था उमेदवारांनी स्वतः च्या खर्चाने करावयाची असून इच्छुकांनी https://mahaamrut.org.in/ या संकेतस्थळावर सर्व आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज करायचा आहे.

### २९ जून पर्यंत ऑनलाईन अर्जांचे आवाहन

प्राप्त अर्जांची छाननी करून ओरिएंटेशन सत्र, परीक्षा आणि मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाईल आणि पहिल्या बॅचसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत २९ जून २०२६ पर्यंत आहे. वाढत्या मानसिक गरजा लक्षात घेता हा उपक्रम केवळ प्रमाणपत्र अभ्यासक्रम नसून प्रत्यक्ष कौशल्य विकास, फिल्ड अनुभव आणि तज्ञांच्या मार्गदर्शनाचा समन्वय साधणारा राज्यातील एक अभिनव उपक्रम असून मानसिक आरोग्य क्षेत्रात अर्थपूर्ण करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे मत पुणे येथील 'एमआयएमएच'चे तज्ञ डॉ. कापसे यांनी व्यक्त केले आहे.

## संपादकीय...

# नॉर्वे : तंत्रज्ञानाच्या वापराबाबत संतुलन साधण्याचा प्रयत्न

नॉर्वेने शाळांमध्ये जनरेटिव्ह एआयवर निर्बंध घालून शिक्षणाच्या केंद्रस्थानी मानवी विचारशक्ती, सर्जनशीलता, स्वावलंबी शिक्षण असले पाहिजे, हा संदेश दिला आहे. जग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या युगात प्रवेश करत असताना एक विचित्र विरोधाभास समोर येत आहे. एका बाजूला उद्योग, विज्ञान, संशोधन आणि दैनंदिन जीवनात एआयचा वापर वाढविण्यासाठी देशांमध्ये स्पर्धा सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला काही देश शिक्षणाच्या क्षेत्रात या तंत्रज्ञानावर मर्यादा घालण्याचा मार्ग स्वीकारत आहेत. तंत्रज्ञान जितके वेगाने पुढे जात आहे, तितक्याच वेगाने एक प्रश्नही समोर येत आहे. माहिती सहज उपलब्ध होणे आणि बुद्धिमत्ता विकसित होणे या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत का? नॉर्वेने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये जनरेटिव्ह एआयच्या वापरावर निर्बंध घालण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ शैक्षणिक धोरण नसून, मानवी विचारशक्ती आणि बौद्धिक स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करणारा एक वैचारिक संदेश आहे. आजच्या काळात कोणत्याही प्रश्नाचे उत्तर, निबंध, प्रकल्प, गणिती उदाहरणे, भाषांतरे किंवा संशोधनाची प्राथमिक माहिती एआय सहज देऊ शकते; पण उत्तर मिळणे आणि ज्ञान प्राप्त होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. शिक्षण म्हणजे केवळ माहिती जमा करणे नव्हे, तर विचार करण्याची क्षमता विकसित करणे, शंका विचारण्याची सवय निर्माण करणे आणि समस्यांचे समाधान शोधण्याची वृत्ती घडवणे. म्हणूनच नॉर्वेने घेतलेल्या निर्णयाकडे तंत्रज्ञानावरील बंदी म्हणून नव्हे, तर शिक्षणाच्या मूळ तत्त्वांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न म्हणून पाहण्याची गरज आहे. नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गार स्टोरे यांनी स्पष्टपणे सांगितले की, शाळेत मुलांनी वाचायला, लिहायला आणि गणित शिकायला हवे. या साध्या विधानात आधुनिक शिक्षणाचा मूलभूत गाभा दडलेला आहे. कारण, विचारशक्तीचा पाया मजबूत झाल्याशिवाय कोणतेही तंत्रज्ञान खऱ्याअर्थाने उपयोगी ठरत नाही. एआयमुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयाचे उत्तर त्वरित मिळू शकते; परंतु उत्तर मिळण्याच्या या सोयीमुळे विचार करण्याची प्रक्रिया मागे पडण्याचा धोका आहे. एखादे गणिताचे उदाहरण सोडवताना, निबंध लिहिताना किंवा एखाद्या समस्येवर विचार करताना मेंदूचा विकास होत असतो. चुका होतात, त्या सुधारल्या जातात आणि त्यातूनच शिकण्याची प्रक्रिया घडते; परंतु प्रत्येक टप्प्यावर एआयच आधार बनला, तर विद्यार्थी तयार उत्तरांचे ग्राहक बनतील, निर्माते नव्हे, ही भीती नॉर्वेने ओळखली. शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे नसतो. शिक्षण माणसाला स्वतंत्र विचार करण्याची क्षमता देते. चिकित्सक दृष्टिकोन, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि निर्णय क्षमता या गुणांचा विकास करते. कृत्रिम बुद्धिमत्ता कितीही प्रगत झाली, तरी मानवी जिज्ञासा आणि सर्जनशीलतेची जागा घेऊ शकत नाही. म्हणूनच अनेक शिक्षणतज्ज्ञ लहान वयात एआयच्या अनियंत्रित वापराबाबत चिंता व्यक्त करत आहेत. नॉर्वेने यापूर्वी शाळांमध्ये स्मार्ट फोन वापरावरही निर्बंध घातले होते. विद्यार्थ्यांचे एकाग्रतेचे प्रश्न, स्क्रीनवरील वाढते अवलंबित्व आणि घटती शैक्षणिक गुणवत्ता यामुळे हा निर्णय घेण्यात आला होता. आता एआयबाबत घेतलेला निर्णयही त्याच विचारसरणीचा विस्तार आहे. यामागे तंत्रज्ञानाला विरोध नसून तंत्रज्ञानाच्या वापरात संतुलन राखण्याचा प्रयत्न आहे. खरे तर, एआय हे भविष्यातील अपरिहार्य वास्तव आहे. त्यापासून विद्यार्थ्यांना कायम दूर ठेवणे शक्यही नाही आणि योग्यही नाही; पण प्रथम मूलभूत शिक्षण, भाषेचे ज्ञान, गणिती क्षमता आणि स्वतंत्र विचार करण्याची सवय विकसित होणे आवश्यक आहे. एआय हे शिक्षक किंवा विचारशक्तीचा पर्याय नसून एक पूरक साधन आहे, ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे. भारतातही हा विषय गंभीरपणे विचार करण्यासारखा आहे. विद्यार्थी गृहपाठापासून संशोधनापर्यंत प्रत्येक कामासाठी एआयवर अवलंबून राहू लागले, तर शिक्षणाच्या मूळ उद्देशालाच तडा जाऊ शकतो. विद्यार्थ्यांना एआयचा वापर शिकवण्याबरोबरच त्याचा विवेकपूर्ण वापर कसा करावा, हे शिकवणे अधिक गरजेचे ठरणार आहे. एआय ही मानवी प्रगतीची मोठी संधी आहे; पण मानवी बुद्धिमत्तेची जागा घेणारी व्यवस्था नाही. नॉर्वेचा निर्णय हा एआयविरोधी नसून मानवी विचारशक्तीच्या बाजूने उभा राहण्याचा प्रयत्न आहे. भविष्यातील पिढी तंत्रज्ञानाची गुलाम न बनता त्याचा सुजाण वापर करणारी, सर्जनशील आणि स्वतंत्र विचार करणारी बनावी, हाच या निर्णयामागचा खरा संदेश आहे. आणि कदाचित, वेगाने बदलणाऱ्या या डिजिटल युगात जगाला सर्वाधिक गरजही याच विचाराची आहे.

# शासनाचे एससी आरक्षणातील उपवर्गीकरण म्हणजे आरक्षण विरोधच...

आगरी कोळी ओबिसिनो तुम्ही कुणाच्या बाजूने जाणार?– राजाराम पाटील. आरक्षणाचा लाभ शोषित वंचित जातीतील शेवटच्या घटकास व्हावा म्हणून एससी अस्पृश्य ठरविलेल्या ५९ जातीतील एकसंघ समूहाचे चार गट करून स्वतंत्र आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासन घेत आहे. या समूहातील धर्मांतरित बौद्ध (पूर्वीची महार)जातीने मातंग जातीचे आरक्षण खाल्ले आहे.असा आरोप ठेऊन वर्तमान देवेंद्र फडणवीस (ब्राह्मण) एकनाथ शिंदे (मराठा) दिवंगत अजित दादा पवार (मराठा) या मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री यांचे शासन अस्पृश्य जातींचा न्याय करायला निघाले आहे?. तर आरक्षणधारी जातींचे ऐक्य कायम रहावे.त्यांची विभागणी होऊ नये म्हणून आंबेडकरी विचारांचे लोक त्याला विरोध करीत आहेत.एप्रिल मे मधल्या अत्यंत तप्त उन्हात सुरू झालेली ही लढाई जून महिन्यातल्या पावसात थांबत नाही.उपवर्गी करणाच्या विरोधात बीड जिल्ह्यातील मातंग सोडून इतर जातींचा मोर्चा मातृसत्ताक आगरी कोळी भंडारी मुंबई मध्ये पोहचत आहे.या लॉंग मार्चचे मी स्वागत करीत आहे.

आपल्याला आठवत असेल.महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात पुढे असलेल्या,पुढारी राज्यकर्त्या मराठा समाजाने आम्हाला ओबीसी आरक्षण मिळावे. यासाठी जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या मराठा मोर्चाला मी जाहीर विरोध केला होता.माझ्या भूमिकेस फार कमी लोकांनी पाठिंबा दिला होता.अर्थात हिंदू मनुस्मृतीचे चातुर्वर्ण्य पद्धतीने स्त्रिया शूद्र अतिशूद्र यांचे केलेले शोषण अनेक हिंदू म्हणविलेल्या जातींतील लोकांना अजूनही पटलेले नाही.या विषयावर लिहिताना बोलताना प्रचंड शिव्या उच्चवर्णीय ब्राह्मण मराठा वैश्य या जातींकडून मला मिळत आहेत. त्यांचे गुलाम झालेले ओबीसी लोकही माझ्या विरोधात बोलत असतात. अर्थात सामाजिक न्याय न समजलेल्या उच्चवर्णीय हिंदू मानसिकतेच्या लोकांसाठी आरक्षण हा विरोधाचा विषय झालेला आहे.आरक्षणाने देशाची प्रगती थांबली आहे.इतका विकृत प्रचार देशात उच्च जातींकडून सुरू आहे.देशातील ८५टक्के ओबीसी एससी एसटी यांना आपली स्वतः च्या हक्कांच्या, आरक्षणातील भूमिका ठरविणे अवघड झाले आहे.तर आरक्षण विरोधक उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांनी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक म्हणून स्वतःस घोषित करून ,समतेच्या संविधानास मान्य नसलेले आर्थिक दुर्बलांचे आरक्षण, केंद्रातील भाजपच्या सत्तेच्या आधारे मिळविले आहे.तरीही हे शोषक निर्लज्ज लोक हजारो वर्षे शोषित ओबीसी एससी एसटी यांच्या सामाजिक मागासलेपणाचे आरक्षणास विरोध करीत आहेत.

आरक्षण समजून घेणे केवळ ओबीसी बांधवांसाठी नाही तर एससी समूहातील पूर्वीच्या महार आताच्या बौद्ध बांधव सोडून इतर ५८जातीना प्रचंड अन्याय अत्याचार उच्चवर्णीयांकडून, सोसूनही अवघड जात आहे.

जंगलात राहणाऱ्या आदिवासी एसटी जातींना हा विषय उच्चवर्णीय हिंदूंच्या विरोधातला म्हणून समजविणार कोण?.मी ज्या शूद्र जातीत जन्मलो त्या आगरी ओबीसी जातींनी स्वतःस कट्टर हिंदू म्हणून घोषित केले आहे.त्यां आगरी जातीसाठी सर्वात कठीण गोष्ट स्वतःच्या जातीच्या कल्याणासाठी प्रगतीसाठी ‘‘प्राणवायू ‘‘असलेले ओबीसी आरक्षण समजावणे होय.मला ओबीसी आरक्षण हे आंबेडकरी चळवळीने अर्थात प्रामुख्याने बौद्ध बांधवांनी समजावले आहे.तर जन्मापासून वयाच्या पस्तीसी पर्यंत विषमतेच्या संस्कारांची पायभरणी करण्यात ,सर्व हिंदू परंपरा, हिंदुत्ववादी विचारांच्या राजकीय पक्ष,राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजप शिवसेना, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल अनेक हिंदू धर्म संप्रदाय कोकणातील स्वाध्याय परिवार, समर्थ संप्रदाय, शेकडो धार्मिक संप्रदायाचा यात वाटा आहे.रामायण महाभारत भगवत गीता,वेद उपनिषदे यांच्या समर्थकांचा यात मोठा सहभाग आहे.या छोट्याशा लेखात मला हे समजावणे गरजेचे आहे.जन्मापासूनच्या मनुस्मृतीच्या हिंदू संस्कारात वाढलेल्या आगरी ओबीसी तरुणास आरक्षण समजून सांगण्यासाठी जे कष्ट आंबेडकरी भावा बहिणींनी घेतले आहेत.ते व्यक्त करायला माझ्याकडचे शब्द कमी पडतील.त्यांच्या अनंत उपकरणाची आठवण मी ठेऊनच हे लिखाण करीत आहे.

हिंदू धर्माच्या तेहतीस कोटी देव, वेद उपनिषदे पुराणे आणि बलवान ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या विषमतेच्या विरोधातील, समता घेऊन लढणाऱ्या महापुरुषांची नावे आम्ही अभिमानाने घेतो. तथागत बुद्ध ,चार्वाक,महावीर महात्मा फुले,क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले,राजर्षी शाहू महाराज,डॉ बाबासाहेब आंबेडकर आगरी समाजातील नारायण नागू पाटील.ॲड दत्ता पाटील,ओबीसी नेते दि बा पाटील अशी अनेक नावे आहेत.परंतु या फार मोठ्या विचारवंताना आजही अपार प्रेमाने माझ्या पर्यंत आणणाऱ्या आंबेडकरी बंधू भगिनीचे उपकार मी कधीच विसरू शकत नाही. आरक्षणात उपवर्गीकरण करून न्याय मिळेल. असे सांगून भांडणे लावणाऱ्या ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या उच्चजातीय लोकांवर विश्वास ठेवू नये.हा त्यांचा शोषक म्हणून असलेला इतिहास आम्ही शोषित ओबीसी एससी एसटी यांनी कायम लक्षात ठेवला पाहिजे. आम्ही शोषित आहोत.आमचे शोषण वैदिक हिंदू धर्माचे लाभार्थी ब्राह्मण क्षत्रिय मराठा वैश्य यांनी केले आहे. स्वतःच्या अनुभवाने हे मागासवर्गीय बांधवांनी समजून घ्यावे.‘‘माझे तेच खरे मानावे‘‘ हा माझा आग्रह नाही. मुळात आरक्षण हा सामाजिक न्याय आहे.ही गोष्ट प्रत्येक मागास जातीतील त्यांच्या पुढाऱ्यांनी मोठ्या मनाने आपापल्या जात बांधवांना समजावणे गरजेचे आहे.उच्चवर्णीय धार्मिक राजकीय सामाजिक नेतृत्व मागासवर्गीय जातींचे हजारो वर्षे शत्रू आणि शोषक राहिले आहेत.ओबीसी एससी एसटी यांच्या गुलामीवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो.आगरी समाजात ॲड जनार्दन पाटील,जनार्दन कोठेकर ,ॲड दत्ता पाटील,ॲड दी बा पाटील यांनी आरक्षण समजाविण्याचे प्रयत्न केले.अर्थात हा हिंदू धर्म चिकित्सेचा विषय असल्याने त्यांना प्रचंड विरोध हिंदू धर्मीय लोकांकडून झाला. आगरी नेत्यांना अंधश्रद्धाळू आगरी समाजाचा पाठिंबा मिळत नाही .हे ऐतिहासिक सत्य म्हणजे ब्राह्मणी हिंदू धर्माचा ओबीसी लोकांवर असलेला हिंदू विचारांचा प्रभाव होय.विषमतेचे खंडन करण्यासाठी आपापल्या जातींची वैचारिक गुलामी उघड करून महा दयाळू बुद्धांच्या नव्या विज्ञानवादी, तर्कनिष्ठ विचारांचा परिचय करून देणे हे सर्वांचे काम आहे.आंबेडकरी बौद्ध बांधवांनी आपले सर्वस्व पणाला लाऊन हे राष्ट्रीय कार्य म्हणजे साविधानिक राष्ट्रनिर्माण आपल्या देशात कष्टाने घडविले आहे. त्यांच्या त्यागाची,संघर्षाची प्रबोधनाची तुलना कुणाबरोबर होऊच शकत नाही.कोणत्याही मागास जातीस आरक्षणाचा फायदा घ्यायचा असेल? तर त्यास विरोध करणाऱ्या उच्चवर्णीय जातीबरोबर संघर्ष अटल आहे.ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या १५टक्के लोकांकडे धर्म अर्थ काम म्हणजेच धार्मिक सत्ता, राजकीय सत्ता,व्यापार यांची सर्व शक्ती केंद्रित झाली आहे.या संपत्तीचे वाटप मागास ओबीसी एससी एसटी यांना करणे सरकारचे काम होते..सरकार ब्राह्मण मराठा वैश्य यांचे असताना हे काम जीवघेणे झाले आहे.असे असताना ?ओबीसी एससी एसटी यांनी एकत्र येऊन लढलो तरच सामाजिक न्याय म्हणजे आरक्षण मिळू.शकते. एससी आरक्षणात विभाजन हे आरक्षणासाठी लढणाऱ्या आमच्या आंबेडकरी विचारांवर मनुवादी हिंदुत्ववादी लोकांचा सरकार पुरस्कृत हल्ला आहे.यावेळी आंबेडकरी बौद्ध बांधवांच्या सामाजिक नेतृत्वास आम्ही साथ देणे.आर्थिक राजकीय सामाजिक सहाय्य करणे हे स्त्रिया शूद्र अतिशूद्र यांचे काम आहे.या चळवळीस आर्थिक सहकार्य करावे. ही नम्र विनंती मी ओबीसी बांधवास करीत आहे.




आमच्या गुलामिस कारण जर विषमतावादी वैदिक धर्म असेल ?तर ती गुलामी समजून घ्या. पुन्हा पुन्हा सांगतो माझे तेच खरे मानू नका. स्वतःच्या विवेक बुद्धीस विचारा.मी माझे अनुभव सांगत आहे. पुस्तकी पाठांतर नाही.आपल्याला जमीन जंगल समुद्र शिक्षण आरक्षण यांना विरोध हिंदू विचारांचा आहे.माझा हा अनुभव आहे.हा अनुभव तुम्हास होत नाही त्याचे कारण आमचे मन बुद्धीवर त्याचा प्रभाव आहे.आंबेडकरी विचार,सभा,साहित्य ,वक्तृत्व हे भारतातले वेगळ्या विचारांचे ,समतेचे ,मानव मुक्तीचे जग आहे.तेही पाहून घ्या. मग ठरवा.याच मातीत गाडलेला आपलाच समतेचा बंधुतेचा न्यायाचा विचार मातृसत्ताक आई एकविरेचा सुपुत्र भगवान बुद्ध यांनी मांडला.जो आजही आपल्या घरात ,मनात लपला आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात तो सर्वासाठी सांगितला. अगदी उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य अल्पसंख्यांक ,ओबीसी एससी एसटी यांच्या साठी,साऱ्या जगासाठी. त्याच विचारांनी बौद्ध बांधवांची प्रगती झाली.फक्त आरक्षणाने नाही. आरक्षण घेण्यासाठी उच्च शिक्षण गरजेचे आहे.मुंबई विद्यापीठ आगरी कोळी भंडारी लोकांच्या जागेत असूनही आगरी समाजात एकही नाही.हेच दुःख मातंग बांधवांचे आहे.आरक्षण बौद्ध बांधवांनी मिळविले कारण त्यांनी चुकीच्या चालीरीती,मनुस्मृती सोडून ,हिंदू धर्म सोडून डॉ बाबासाहे आंबेडकर बुद्ध फुले यांचा विचार स्वीकारला.ज्यांनी सर्वच आरक्षण आणि अख्खा भारत लुटला. ते ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या शोषणकर्त्या लोकांशी समतेच्या.,मार्गाने, अहिंसक लोकशाही लढाई लढायची आहे.मागास जातींनी आपल्याच भावांशी लढून कसे चालेल.? विचार करा.सोबत या.मी नम्रपणे समजावितो तुम्हाला.स्त्री शूद्र अतिशूद्र यांची गुलामी नष्ट करण्यासाठी आपल्या जातीसाठी गाव गावात शाळा कॉलेज विद्यापीठे काढू.खूप शिकू.महात्मा फुले सावित्री माई यांचा वसा घेऊ. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने सारा भारत एकवीरा पुत्र बुद्धांचा करू.शोषण संपवून समतेचा भारत घडवू .आम्हास हिंदुराष्ट्र नको.संविधानिक राष्ट्र हवे.

जय भारत.
जय भीम.
जय एकवीरा.

**राजाराम पाटील.**
**उरण रायगड.**
८२८६०३१४६३.

# देशातील अग्नी सुरक्षा वाऱ्यावर; लोकांचा जीव टांगणीवर!

लखनौमध्ये कोचिंग सेंटरमध्ये झालेले अग्नितांडव मानवतेसाठी अंगावर शहारे येणारी भयावह घटना आहे.या अग्नीकांड वरून लक्षात येते की, सरकारच्या व प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अशा भयावह घटना दिवसेंदिवस आक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे आणि देशात दररोज कुठे ना कुठे छोटे-मोठे अग्नी तांडव झाल्याचे दिसून येते व यात निरअपराधांचा बळी जात आहे. कारण लखनौमधील कोचिंग सेंटर हे अवैधरित्या चालायचे यामध्ये वाजवीपेक्षा जास्त विद्यार्थी, संपूर्ण नियमांचे उल्लंघन, अग्नी सुरक्षा किंवा आपात्कालीन व्यवस्थेचा अभाव या संपूर्ण गोष्टींचा अभाव लखनौ अग्नीकांडमध्ये दिसून याला आणि याला जबाबदार सर्वप्रथम तेथील प्रशासन व नंतर सरकार. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोचिंग सेंटरवर सरकारने अगोदरच कारवाई केली असती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चौकशी केली असती तर ही दुर्घटना टाळता आली असती. आज सरकार अग्नीकांड पहाता त्या कोचिंग सेंटर मालकावर कारवाई करीत आहे व बुलडोझर ॲक्शन होत आहे हेच काम सरकारने अगोदरच केले असते तर अनेकांचा जीव वाचला असता व आज ही गंभीर स्थिती निर्माण झाली नसती. देशासह राज्यात अनेक काणून-कायदे-नियमावली आहेत परंतु कोणत्याही नियमांचे पालन होत नाही.हे संपूर्ण कायदे-काणून- नियमावली धुऱ्यावर ठेवून (बाजुला सारुन) प्रशासनाच्या मदतीने (भ्रष्टाचाराच्या मार्गाने) बेधडक अवैध धंदे व कामे सुरू आहेत याचे जिवंत उदाहरण म्हणजे लखनौ अग्नीकांड.यामध्ये सरकारची व संबंधित विभागाची साठगाठ सुध्दा असते. देशातील कोचिंगक्लासेस, हॉटेल,लॉज,सरकारी दवाखाने, खाजगी दवाखाने,फुटपाथ आजही असुरक्षित आहे व याचा परिणाम जीवितहानीमध्ये होतो. आगीच्या दृष्टीकोणातुन कोणतेच ऑडिट गांभीर्याने प्रशासनाकडुन घेतले जात नाही व सरकारही यावर जातीने लक्ष देत नाही.कारण यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो व यात मोठमोठे अधिकारी आणि राजकीय पुढारी सहभागी असतात.याची दुर्गंधी संपूर्ण देशात पसरतांना दिसून येते व त्याचे प्रायश्चित्त दुर्घटनेच्या रूपात सर्वसामान्य व भोळ्याभाबड्या जनतेला जीवीत हाणीच्या स्वरूपात भोगावे लागते व त्याचा परिणाम संपूर्ण परिवारावर होतो.अग्निकांडसारख्या भयावह घटनांवर सरकार चौकशी बसविते परंतु हा सर्व दिखावा असतो. दिनांक २२ जून २०२६ ला लखनौमधील अलिगंज भागात एका तीन मजली व्यावसायिक इमारतीला लागलेल्या भीषण आगीत १५ विद्यार्थ्यांचा गुदमरून व होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला तर अनेक जण गंभीर जखमी झाले आणि ही हृदयद्रावक घटना घडली व कोचिंग सेंटर मृत्यूचे सेंटर बनले. सध्याच्या परिस्थितीत देशात प्रशासनाच्या चुकांमुळे दिवसेंदिवस अग्निकांडच्या घटनांमध्ये वाढ होतांना दिसत आहे.याला कारणीभूत वाढते शहरीकरण व त्यामुळे उत्पन्न होणारी गंभीर परिस्थिती सुध्दा कारणीभूत आहे.उत्तरप्रदेश सरकारने माफीया राज,गुंडाराज यावर बुलडोझर चालविले. परंतु प्रशासनाच्या देखरेखीखाली अवैध कामे सुरू आहे आणि यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे ही बाब सरकारच्या अजूनपर्यंत लक्षात कसे काय आले नाही? सर्वसामान्यांना ज्या मुलभूत सुविधांची गरज आहे त्या सुविधांपासून उत्तर प्रदेशातील जनता व देशातील जनता कोसो दूर असल्याचे नुकत्याच झालेल्या लखनौ अग्नितांडवावरून दिसून येते. असेच अग्नितांडव देशातील अनेक राज्यात झालेले आहेत आणि होत आहेत हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. परंतु त्यांच्यावर देशातील संपूर्ण राज्य सरकारे तात्पुरती कारवाई करून सरकारकडून पांघरूण टाकल्याचे काम केले जाते.३ जून २०२६ ला दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील एका हॉटेलला आग लागली होती यात २१ जनांचा मृत्यू झाला होता,उत्तर गोव्यातील पणजी पासून २५ किमी अंतरावर असलेल्या अर्पोरा येथील ‘‘बर्च बाय रोमियो लेन‘‘या गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइट क्लबला दिनांक ६ डिसेंबर २०२५ ला मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला,तर १६ जण गंभीररित्या जखमी झाले होते,याचप्रमाणे तेलंगाणाची राजधानी हैदराबाद येथील ऐतिहासिक चारमिनारस्थित गुलजार हाऊसच्या एका इमारतीला दिनांक १८ मे २०२५ ला सकाळी भीषण आग लागली होती या भीषण आगीत दुर्दैवाने ८ बालकांसह १७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला होता अशा अनेक अनगिनत भयावह घटना देशातील अनेक राज्यात मोठ्या प्रमाणात होत आहे आणि राज्य सरकारे उघड्या डोळ्यांनी पाहत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. देशातील जनता असुरक्षित का आहे याचे मुख्य कारण म्हणजे देशातील वाढता भ्रष्टाचार.कारण अती संवेदनशील कामाची नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) सरकारकडून भ्रष्टाचाराच्या माध्यमातून सहज उपलब्ध होते आणि त्यातून अशाप्रकारच्या भयावह घटनांचा उदय होतो.आजही देशात अवैध निर्माण, अवैध धंदे मोठ्या प्रमाणात राजकीय पुढाऱ्यांचे आहेत किंवा त्यांच्या चेलेचपाट्यांचे आहेत.आज देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे तर काही भ्रष्टाचारी सरकारमध्ये सहभागी आहेत.उदाहरण द्यायचे झाले तर अशोक खरात याचे प्रकरण खूप गाजले यांचा करोडोंचा घोटाळा सरकारच्या निदर्शनास सुध्दा आला. परंतु त्यांच्या मालमत्तेवर सरकारने अजून पर्यंत बुलडोझर चालविले नाही किंवा त्याच्यावर कोणतीही कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही.अशाप्रकारे देशात अनेक भ्रष्टाचारी दिसून येतात व त्यांचे अवैध धंदे दिसून येतात.परंतू यांच्या चुकांचे प्रायश्चित्त देशातील जनतेला मृत्यूच्या रूपात भोगावे लागते. लखनौ अग्नीकांड लक्षात घेता देशातील संपूर्ण राज्य सरकारे जागी झाली आणि महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरमध्ये अग्निशमन विभागाने कारवाईला सुरुवात केली यात १०३ शिकवणी वर्ग (कोचिंग क्लासेस) धोकादायक श्रेणीमध्ये असल्याचे दिसून आले ही फक्त नागपूरची स्थिती आहे यावरून आपण समजू शकतो की,राज्यासह देशातील स्थिती किती भयानक असावी यावरून स्पष्ट होते. देशातील राज्य सरकारे आतापर्यंत झोपून होती.लोकांचा जीव जातो तेव्हा सरकारच्या किंवा संबंधित विभागाला जाग येते ही देशाची शोकांतिका म्हणावी लागेल.त्यामुळे लखनौ अग्निप्रलयातून संपूर्ण राज्य सरकारने व केंद्र सरकारने धडा घ्यावा व जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी.जय हिंद.






लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मुख्यमंत्र्यांनी संपर्क साधल्या नंतर ठिय्या आंदोलन स्थगित करून मृतदेहावर केले तिसऱ्या दिवशी अंत्यसंस्कार

**केज/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील टाकळी तालुका केज येथील विलास घुले याच्या मृतदेहावर मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांशी संवाद साधून एसआयटी चौकशीची मागणी मान्य केल्या नंतर तिसऱ्या दिवशी अंत्यसंस्कार करण्यात आले. तर विलास घुले याच्या खून प्रकरणातील नऊ आरोपी विरुद्ध उमेश माने याच्या तक्रारी वरून अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आंदोलकांनी खा. बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरव सोनवणे यांनाही सह आरोपी करण्याची मागणी केली होती. तसेच विलास घुले यांचे भाऊ रमेश घुले यांनी दिलेल्या पुरवणी जबाबात सौरव सोनवणे यांच्या नावाचा उल्लेख केला असल्याने आता या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे.

एका अनैतिक संबंधाच्या प्रकरणी उमेश माने याला विवाहितेचा पती आणि तिच्या वडील व नातेवाईकांनी मारहाण केली. त्यांच्या पासून जिवाच्या आकांताने जिव वाचविण्यासाठी जमाव त्याचा पाठलाग करीत असताना उमेश माने याला



वाचविण्यासाठी हॉटेल मालक विलास घुले हे त्याला सोडविण्यासाठी त्याच्या मागे गेले होते.

परंतु संतप्त जमावाने भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या हॉटेल मालक विलास घुले यांना मारहाण केली. आणि जमावातील रामेश्वर गायकवाड यांनी विलास घुले याच्या पोटात चाकूने वार केला होता. त्या नंतर उपचारा दरम्यान दि. २१ जून रोजी दुपारी ३:०० च्या सुमारास विलास घुले यांचा मृत्यू झाला. त्या नंतर संतप्त झालेल्या नातेवाईक आणि नागरिकांनी विलास घुले यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्यात यावी, पोलिस अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात यावे. विलास घुले यांच्या मृत्यूची एस आय टी मार्फत चौकशी करण्यात यावी. खा. बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरव सोनवणे यांनी खून प्रकरणातील आरोपींना मदत केल्याच्या संशया वरून त्यांना सहआरोपी करण्यात यावे. या मागण्यासाठी केज येथे रस्ता रोको आंदोलन करून केज शहर कडकडीत बंद आंदोलन करून विलास घुले याचा मृतदेह असलेली रुग्णवाहिका पोलिस ठाण्यात आणून ठिय्या दिला होता. या आंदोलनात ओबीसीचे नेते प्रा. लक्ष्मण हाके हे सहभागी होते. आंदोलकांनी सरकार आणि पोलिस प्रशासनावर प्रचंड रोष व्यक्त करीत घोषणाबाजी केली होती.

त्या नंतर मुख्यमंत्र्यांनी एसआयटी चौकशीची मागणी मान्य करीत आंदोलन थांबविण्याची विनंती केल्याने तिसऱ्या दिवशी दि.२३ जून मंगळवार रोजी रात्री ११:०० वाजण्याच्या सुमारास आंदोलन थांबवून विलास घुले याचा मृतदेह पोलिस ठाण्याच्या आवारातून टाकळी येथे घेऊन जात रात्री अंत्यसंस्कार केला.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोबाईल वरून केली प्रा. लक्ष्मण हाकेशी चर्चा**

विलास घुले यांच्या मृत्यूमुळे केज येथे तीन दिवसा पासून रस्ता रोको, ठिय्या आंदोलन आणि बंद सुरू होते. दि. २३ जून रोजी ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी केज पोलिस ठाण्या समोर ठिय्या आंदोलनात सहभागी झाल्याने प्रशासनावर दबाव वाढविला होता. आणि जमाव देखील आक्रमक होत होता. याची सर्व माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी प्रा. लक्ष्मण हाके यांच्याशी मोबाईल वरून संवाद साधत मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिल्या नंतर ठिय्या आंदोलन स्थगित केले.

**एस आय टी स्थापन**

विलास घुले यांच्या मृत्यूची निः पक्षपातीपणे चौकशी करण्यासाठी एसआयटी गठित करण्यात आली असल्याची विश्वसनीय माहिती मिळते आहे.

**विलास घुले खून प्रकरणातील मारेकऱ्या विरुद्ध अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल**

उमेश माने याच्यावर विवाहित महिलेच्या अनैतिक संबंधाचा संशया वरून त्याला मारहाण होत असताना त्याला वाचविण्यासाठी गेलेल्या हॉटेल मालक विलास घुले यांच्या खून प्रकरणातील मुख्यआरोपी रामेश्वर गायकवाड यांच्यासह बाबासाहेब गुरुबा कदम, मंगेश गोरख कदम, शुभम रामभाऊ गायकवाड, भैय्या साहेब गायकवाड, अजय उर्फ बंकट कदम, नवनाथ परसराम कदम, दिपक परसराम कदम आणि संतोष नरहरी कदम या नऊ जणांच्या विरुद्ध अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**आरोपींना सात दिवसाची पोलिस कोठडी**

विलास घुले हत्या प्रकरणातील मुख्यआरोपी रामेश्वर गायकवाड यांच्यासह बाबासाहेब गुरुबा कदम, मंगेश गोरख कदम, शुभम रामभाऊ गायकवाड, भैय्या साहेब गायकवाड, अजय उर्फ बंकट कदम, नवनाथ परसराम कदम, दिपक परसराम कदम आणि संतोष नरहरी कदम यांना पोलिसांनी अटक केली आहे. सर्व आरोपींना केज न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्या सर्व आरोपींना ३० जून पर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## मूलभारती एकता परिषद

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने २१ जून २०२६, शुक्रवार ला सकाळी ११:०० वाजता, सावरकर चौकातील शासकीय ग्रंथालयाजवळ, गांधी भवन, छत्रपती संभाजीनगर येथे ''सुदृढ एकसंघ भारताच्या निर्मितीसाठी सर्व संवैधानिक ( , , व इतर) समूहाचे ऐक्य होणे ही काळाची गरज आहे.'' या ऐतिहासिक प्रासंगिक विषयावर सामाजिक न्याय दिन व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त सामाजिक जनजागृतीच्या अनुषंगाने ''मूलभारती एकता परिषद'' आयोजीत करण्यात आली आहे.

या परिषदेला चळवळीच्या कार्यकर्त्या अॅड. प्रतिज्ञा भगत उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच दैनिक बुलंद शक्तीचे संपादक रामेश्वर दरेकर, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते बी. जी. बनसोडे, भारतीय भटके विमुक्त आदिवासी ओबीसी संघर्ष महासंघाचे संस्थापक अध्यक्ष अशोक धनगावकर, ओबीसी भटके विमुक्त संघर्ष समितीचे संयोजक राजेंद्र वनारसे, सत्यशोधक विचार प्रचारक अरविंद खैरनार, मा. प. विधी महाविद्यालयाचे प्रा. श्रीकिशन मोरे, राज गायकवाड, सम्यक रामटेके हे सर्व प्रातिनिधिक स्वरूपात हे मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. करिता आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व अखिल भारतीय नाग संघाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

पान १ वरून...

## महा-एआय मॉडेलद्वारे डेटा - आधारित प्रशासन उभारण्याच्या दिशेने शासनाचे महत्त्वाचे पाऊल

चेहरा असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नागरिकांना प्रत्यक्ष मदत मिळवून देणाऱ्या या केंद्रांमध्ये एकसमान सुविधा, स्पष्टता आणि गुणवत्ता असणे आवश्यक आहे. स्पर्धात्मक वातावरण निर्माण करून सेवा केंद्रांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी प्रोत्साहनपर व्यवस्था उभारण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

डिजिटल हयातीचा दाखला ज्येष्ठ नागरिकांना दिलासा

पेन्शनधारक आणि विविध योजनांच्या लाभार्थ्यांना हयातीच्या दाखल्यासाठी वारंवार शासकीय कार्यालयांमध्ये जावे लागते. ही प्रक्रिया नागरिकांसाठी त्रासदायक ठरत होती. डिजिटल लाईफ सर्टिफिकेट प्रणालीमुळे नागरिकांना कार्यालयांचे फेरे मारावे लागणार नाहीत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

राज्याचे महा एआय मॉडेल प्रशासनासाठी गेमचेंजर

राज्य शासन आणि राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने (एनआयसी) विकसित केलेले महा एआय मॉडेल हे महाराष्ट्राच्या डिजिटल प्रवासातील महत्त्वाचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. शासनाकडे सर्वाधिक प्रमाणात डेटा निर्माण होतो आणि वापरला जातो. डेटा हेच आजचे नवीन सोने आणि नवीन तेल असल्याचे नमूद करत त्यांनी शासनाचा डेटा शासनाच्या स्वतःच्या एआय मॉडेलद्वारे वापरणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. स्वतःच्या डेटावर प्रशिक्षित होणारी एआय प्रणाली भविष्यातील सायबर आणि माहितीविषयक धोक्यांपासून संरक्षण देण्यास मदत करेल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला. महा एआय मॉडेल प्रशासनातील कार्यक्षमता वाढविणे, निर्णय प्रक्रिया गतिमान करणे आणि नागरिकांना अधिक जलद सेवा देण्यासाठी उपयुक्त ठरेल. याच्या सातत्यपूर्ण वापरातून आणि प्रशिक्षणातून प्रशासन अधिक प्रतिसादक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्राची डिजिटल प्रशासनात नवी झेप

राज्यात सुरू करण्यात आलेले सर्व उपक्रम हे केवळ तांत्रिक सुधारणा नसून प्रशासनात लोकाभिमुखता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्याचे प्रभावी साधन आहेत. या सर्व उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचा नियमित वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी माहिती तंत्रज्ञान विभाग, एनआयसी आणि संबंधित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले.

अपर मुख्य सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी डिजिटल हयातीच्या दाखल्याचे सादरीकरण केले. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह व राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र सपना कपूर यांनी महा एआय प्लॅटफॉर्मबाबत सादरीकरण केले.

विविध प्रणालीबद्दल थोडक्यात माहिती

महा-डीबीटी २.० : महा-डीबीटी २.० ही प्रणाली इलेक्ट्रॉनिक्स,माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने विकसित केली असून सर्व डीबीटी योजनांसाठी एकच पोर्टल आहे. सिंगल साइन-ऑन, डॅशबोर्ड व डेटा विश्र्लेषण सुविधा आहे. अर्जातील माहिती १३८ वरून ६६ क्षेत्रांपर्यंत कमी केली आहे. आधार आधारित पडताळणी व जलद लाभ वितरण.

आपले सरकार सेवा केंद्र मानांकीकरण : आपले सरकार सेवा केंद्रामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागातंर्गत राज्यातील ३१ हजारांहून अधिक सेवा केंद्रांचे मानांकीकरण. एकसमान ब्रँडिंग व सेवा गुणवत्ता निकष. स्मार्ट आपले सेवा केंद्र दर्जा देण्याची नवीन योजना घोषित करण्यात आली यामध्ये राज्य, विभागीय व जिल्हास्तरावर पुरस्कार देण्यात येतील दरवर्षी ३५० पेक्षा अधिक केंद्रांचा गौरव करण्यात येणार आहे.

महा एआय प्रणाली :

महा एआय ही प्रणाली राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने विकसित केली असून ती राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय' - प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम सूरू.

डिजिटल हयातीचा दाखला : डिजिटल हयातीचा दाखला राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र मार्फत सामाजिक न्याय विभागाच्या सहाय्याने ही प्रणाली कार्यरत असणार आहे.घरबसल्या हयातीचा दाखला सादर करण्याची सुविधा मिळेल. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी सुलभ सेवा देता येणार आहे. या सुविधेमुळे कार्यालयीन भेटीची गरज नाही. कागदविरहित व रिअल-टाइम पडताळणी होणार असून लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वितरणातील विलंबात घट होण्यास मदत होणार आहे.

## पाण्याच्या टाकीवर चढून उपसरपंचाचा आत्मदहनाचा प्रयत्न



**केज/प्रतिनिधी** : केज तालुक्यातील सोनेसांगवी येथील शेतरस्त्यावर झालेले अतिक्रमण हटवून रस्ते खुले करावे आणि अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी रद्द करण्याच्या मागणीसाठी उपसरपंचाने पाण्याच्या टाकीवर चढून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

केज तालुक्यातील शेत रस्त्यावर बब्रुवान केरबा कणसे आणि सतिश देशपांडे यांनी.अतिक्रमण करून रहदारीस व वहिवाटीस अडथळा केला असल्याने शेतकऱ्यांना ऊस वाहतूक आणि शेतीची कामे करण्यास व ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत असल्याने, रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्यांचा फार्मर आयडी रद्द करण्यात यावा. उपसरपंच राहुल डीकले यांनी वारंवार पाठपुरावा करून देखील शासकीय अधिकारी अतिक्रमण हटवित नसल्याने सोनेसांगवी गावचे उपसरपंच राहुल डिकले आणि सुरज इखे यांनी दि. २३ जून रोजी पाण्याच्या टाकीवर चढून अंगावर डिझेल सदृष्य ज्वलनशील द्रव्य ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान या प्रकरणी प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी तहसीलदार शुभम पवार पवार यांनी मोबाईल वरून आंदोलकाशी संपर्क साधून कारवाईचे आश्वासन दिले आहे.

## विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठी विविध कर्ज योजना; ऑनलाईन अर्जांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) अंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील लोकांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजनांसाठी जिल्ह्यातील पात्र व इच्छुक लाभार्थ्यांनी महामंडळाच्या www.vnvjntdc.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

महाराष्ट्र शासनाने वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ, रामोशी समाजासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, लोहार समाजासाठी ब्रह्मलीना आचार्य पुराजी महाराज आर्थिक विकास महामंडळ, गवळी समाजासाठी श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ, विणकर समाजासाठी विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ आणि नाथपंथीय समाजासाठी श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ अशी सहा उपकंपनी महामंडळे स्थापन केली आहेत. या सर्व महामंडळांचे कामकाज मुख्य महामंडळांतर्गतच सुरु असून मुंबई येथील मुख्यालयाकडून सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता जिल्हास्तरावर वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, थेट कर्ज योजना आणि बीज भांडवल कर्ज योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

या अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत असून, यासाठी अर्जदार विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील आणि १८ ते ४५ वर्षे वयोगटातील असावा. तसेच त्याचे बँक खाते आधार कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे. दुसरी योजना गट कर्ज व्याज परतावा योजना असून तिची मर्यादा १० लाख ते ५० लाख रुपयांपर्यंत आहे, ज्यासाठी नोंदणीकृत गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५ वर्षे असावे आणि नॉन-क्रीमीलेअरसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत असावी. तसेच महामंडळाकडून राबविल्या जाणाऱ्या १ लाख रुपयांच्या थेट कर्ज योजनेसाठी दोन जामीनदार व बोजा नोंद करून देणे आवश्यक असून यासाठी वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपर्यंत असावे लागते. याशिवाय बँकेमार्फत राबविल्या जाणाऱ्या २५ टक्के बीज भांडवल योजनेमध्ये बँकेचा सहभाग ७५ टक्के तर महामंडळाचा सहभाग २५ टक्के असतो आणि या योजनेसाठीही १ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे.

वरील सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्जदारांनी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, वयाचा पुरावा आणि संबंधित व्यवसायाचे कोटेशन किंवा परवाना यांसारखी सर्व मूळ कागदपत्रे महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करून ऑनलाईन अर्ज भरणे गरजेचे आहे. लातूर जिल्ह्यातील पात्र व इच्छुक लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी अथवा ऑनलाईन अर्ज करण्यासाठी महामंडळाच्या www.vnvjntdc.org या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, गुळ मार्केट समोर, जुनी डाल्डा फॅक्ट्री, लातूर येथील जिल्हा कार्यालयात संपर्क साधावा, तसेच अधिक चौकशीसाठी ०२३८२-२९९६०७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा व्यवस्थापक पी. एम. झोंबाडे यांनी केले आहे.

# उमरी टोल वरील टीसी कर्मचाऱ्यांचे पगार वाढीसाठी काम बंद आंदोलन

### स्थानिक चे सुपरवायझर हे आमचा आवाज दाबत आहेत- कर्मचाऱ्यांचा आरोप

**केज/प्रतिनिधी** : अहिल्यानगर-अहमदपूर महामार्गावरील केज तालुक्यातील डोणगाव फाटया जवळील उमरी (प्लाझा) टोल नाका हा मल्लिकार्जुन सिधाराम पाटील, सोलापूर या नावाची कंपनी सदर टोल (प्लाझा) चालवत असून येथील टीसी कर्मचाऱ्यांचे पगार वाढीसाठी काम बंद आंदोलन चालू असून या टीसी कर्मचाऱ्यांचा आवाज स्थानिक चे सुपरवायझर हे दाबत आहेत असा आरोप माध्यमांशी बोलताना टीसी कर्मचाऱ्यांनी केला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, अहिल्यादेवी नगर-अहमदपूर महामार्गावर केज तालुक्यातील डोणगाव फाट्या जवळील उमरी टोल नाक्यावर जवळपास ३० तरुण युवक हे टीसी कर्मचारी म्हणून काम करत आहेत. सध्या उमरी येथील टोल नाका चालवत असलेल्या मल्लिकार्जुन सिधाराम पाटील, सोलापूर या कंपनीकडून टीसी कर्मचाऱ्यांना ठरल्याप्रमाणे वाढीव पगार देण्यात येत नसल्याने दिनांक जून २०२६ उमरी टोल प्लाझा चे व्यवस्थापक यांना कर्मचाऱ्यांनी पगार वाढीसह इतर मागण्याचे निवेदन दिले होते. जर २४ तासांच्या आत मध्ये आमची मागणी पूर्ण न केल्यास दिनांक २४ जून २०२६ दुपारपासून कोणतेही टीसी बंधू काम करणार नाहीत असा इशारा देण्यात आला होता. परंतु टीसी कर्मचाऱ्यांच्या संबंधित कंपनीने मागणीची कसलीच दखल न घेतल्यामुळे बुधवारी दुपारी २-०० वाजल्यापासून कर्मचारी यांनी पगार वाढीसह विविध मागण्यासाठी काम बंद आंदोलन चालू केले. कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन चालू केल्याने वरिष्ठांनी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून ५ जुलै २०२६ पर्यंत चा वेळ मागितला.

परंतु कर्मचाऱ्यांना वरिष्ठांचे तोंडी आश्वासन मान्य नसल्याने ते आंदोलनावर ठाम राहिले कर्मचारी हे वरिष्ठांना लेखी आश्वासन द्यावे अशी मागणी लावून धरत आंदोलनावर ठाम राहिले. सदरील दिलेल्या निवेदनात कर्मचाऱ्यांनी म्हटले की, आम्ही आमच्या कामाशी एकनिष्ठ राहून कंपनीच्या प्रगतीसाठी नेहमीच आमचे सर्वोत्तम योगदान दिले आहे या कालावधीत आमच्या जबाबदाऱ्या वाढलेल्या आहेत आणि आम्ही त्या यशस्वीरित्या पार पाडलेल्या आहेत आमच्या कंपनीच्या उद्दिष्ट मध्ये सातत्यपूर्ण यश आणि कार्यप्रदर्शन लक्षात घेता आम्ही आमच्या सध्याच्या आढावा घेऊन पगारवाढ करावी अशी विनंती करत आहोत. सध्याच्या महागाईचा विचार करता आणि आमच्या अनुभवानुसार आमच्या वेतनात योग्य वाढ मिळावी ही अपेक्षा आहे. आमच्या योगदानाचा योग्य वापर करून आमच्या वेतनात वेतन वाढ करण्यात यावी जेणेकरून आम्ही आणखी उत्साहाने काम करत राहू.

मागण्या:-सर्व टीसी यांचा पगार हा दरमहा १५ हजार रुपये करावा. टीसीला महिन्यातून चार सुट्ट्या देण्यात याव्यात. आज पर्यंतचा कर्मचाऱ्यांचा पीएफ जमा करण्यात यावा. पगार पत्र देण्यात यावे. या मागण्यासाठी टीसी कर्मचाऱ्यांनी बुधवार रोजी दुपारपासून काम बंद आंदोलन पुकारले.

यावेळी माध्यमांशी बोलताना कर्मचाऱ्यांनी सांगितले की, आम्ही आमच्या मागण्यासाठी आवाज उठविण्याचा प्रयत्न केला तर स्थानिक चे सुपरवायझर हे आमचा आवाज दाबत आहेत व आम्हाला कामावरून काढण्याच्या धमक्या देत आहेत असा आरोप केला आहे. त्याचबरोबर सदरील टोल नाक्याच्या इतर अधिकारी कर्मचारी यांना जेवण्यासाठी वेगळी किचन व्यवस्था




व सर्व टीसी कर्मचाऱ्यांना वेगळी व्यवस्था करण्यात आलेली आहे ज्या ठिकाणी आम्हाला जेवण्या साठी रूम दिली ती रूम स्वच्छालयाच्या जवळ असल्याने शौचालयाची दुर्गंधी येते व आम्हाला तेथे व्यवस्थित जेवता येत नाही असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. तर महिला कर्मचारी यांनी प्रसारमाध्यमांना माहिती देताना सांगितले की, या ठिकाणी संडास बाथरूम मध्ये पाण्याची देखील व्यवस्था नाही, त्यामुळे महिलांना वाशरूमला अथवा बाथरूमला जाण्यास अडचण निर्माण झालेली आहे अक्षरशा महिला कर्मचाऱ्यांनी येथील स्वच्छतेचा व व्यवस्थेचा प्रसारमाध्यमासमोर परदा फाश केला आहे. त्याचबरोबर सफाई महिला कर्मचारी यांनी सांगितले की, या ठिकाणी स्वच्छता व सफाई करण्यासाठी लागणारे साहित्य हे मला वेळेत पुरवण्यात येत नाही व दिले जात नाही त्यामुळे मला साफसफाई करण्यास अडचण भासत आहे.

लेखी दिलेल्या निवेदनावर सय्यद अल्ताफ अयुब, संतोष दिवटे, सचिन सिरसट, अभिषेक सिरसट, राहुल सोनवणे, विजय भोयटे, राजपाल सोनवणे यांच्यासह २४ कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टर पुरवठा योजनेसाठी १० जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन स्तरावरून निश्चित करण्यात आल्या असून, हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नागरिकांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. लातूर जिल्ह्यातील इच्छुक आणि पात्र बचत गटांकडून सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र बचत गटांनी आपले अर्ज पूर्ण भरून येत्या १० जुलै २०२६ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन लातूर समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## लातूर येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी १ जुलैपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील बार्शी रोडवर असलेल्या आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता कनिष्ठ महाविद्यालय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया १ जुलै, २०२६ पासून सुरू होत आहे. अनुसूचित जमातीच्या इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी www.swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आपले वसतिगृह प्रवेशाचे ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत सादर करावेत. या प्रवेश प्रक्रियेच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी टोल फ्री क्रमांक १८००२६७०००७ वर संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## लातूर येथे आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरामध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता अकरावीपासून पुढील वर्गातील सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह (नवीन), शंभू नगर, लातूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील ३३ नवीन जागांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अनुसूचित जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांनी www.swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर १ जुलै, २०२६ पासून आपले वसतिगृह प्रवेशाचे ऑनलाईन अर्ज सादर करावेत. या प्रवेश प्रक्रियेच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी टोल फ्री क्रमांक १८००२६७०००७ वर किंवा प्रत्यक्ष वसतिगृहाच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर येथील एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी आणि लातूर वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र व गुणवंत बालकांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संदीप यादव यांनी केले आहे. शिक्षण, कला व सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य आणि शौर्य यांसारख्या विविध क्षेत्रांत विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेल्या ५ वर्षांपेक्षा अधिक आणि १८ वर्षांपर्यंतच्या अशा बालकांना हा पुरस्कार दिला जातो. केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार या पुरस्कारासाठीची अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून, इच्छुक उमेदवारांचे अर्ज १ एप्रिल ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत केवळ https://awards.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरच स्वीकारले जातील. या संकेतस्थळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातून किंवा ऑफलाईन पद्धतीने प्राप्त होणारे नामनिर्देशन अर्ज स्विकारले जाणार नसल्यामुळे, जिल्ह्यातील पात्र बालकांनी विहित वेळेत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## मुंबई हादरली! धावत्या लोकलमध्ये तरुणाची हत्या

मुंबई : मुंबईच्या लोकलमधून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. मात्र, याच गर्दीच्या लोकलमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बोरिवली स्टेशन परिसराजवळ मुंबई लोकलमध्ये एका प्रवाशाची चाकूने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही खळबळजनक घटना मंगळवारी रात्री घडली. मुसळधार पावसात लोकलचा दरवाजा बंद करण्याच्या किरकोळ वादातून ही थरारक घटना घडल्याचं समोर आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री १० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे लोकलचा दरवाजा बंद करण्यावरून दोन प्रवाशांमध्ये जोरदार वाद सुरू झाला. हा वाद इतका टोकाला गेला की, डब्यातील एका प्रवाशांनी मिळून आरोपीला मारहाण केली. या मारहाणीमुळे संतप्त झालेल्या आरोपीने तातडीने आपल्या बॅगेतून चाकू काढला आणि मयांक लोहार नावाच्या प्रवाशावर सपासप वार केले.या जीवघेण्या हल्ल्यात मयांक लोहार हे गंभीररीत्या जखमी झाले होते. ते रक्ताच्या थारोळ्यात पडले होते.

# बाजार समितीतील घटक जोपासतायत सामाजिक बांधिलकीचा लातूर पॅटर्न

## सलग २६ वर्षापासून पाठवितात चाकरवाडीच्या हरीनाम सप्ताहास धान्याचा ट्रक

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर बाजार समितीला राज्यात मानाचे स्थान मिळवून देण्यात बाजार समितीतील विविध घटकांचा सिहांचा वाटा आहे. यासोबतच बाजार समितीतील या घटकांकडून सामाजिक बांधिलकीही जोपासली जात आहे. दरवर्षी विविध उपक्रम राबवून बाजार समितीतील घटक आपली सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करीत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणजे सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांचा चाकरवाडी येथे होणाया अखंड हरिनाम सप्ताहास गेल्या २६ वर्षापासून धान्याचा ट्रक पाठविला जातो. यंदाच्या वर्षीही हा धान्याचा ट्रक माजी आमदार वैजनाथ शिंदे व सभापती जगदीश बावणे यांच्या प्रमुख उपस्थितीत चाकरवाडीकडे रवाना करण्यात आला आहे.

लातूर बाजार समितीने राज्यात मानाचे स्थान मिळविलेले आहे. हे स्थान मिळविण्यात बाजार समितीतील व्यापारी, आडते यांच्यासह विविध घटकांचा सिंहाचा वाटा आहे. बाजार समितीतील हे घटक केवळ व्यापारातच नव्हे तर सामाजिक बांधिलकी जोपासण्यातही अग्रेसर आहे. दरवर्षी बाजार समितीच्या आवारात या घटकांच्या वतीने विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासली जाते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणजे चाकरवाडी येथे पार पडत असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहास गेल्या २६ वर्षापासून मोफत धान्य रवाना करण्यात येते. बाजार समितीतील विविध घटकांच्या सहकार्यातून हा ट्रक अखंड हरीनाम सप्ताहात होणाया अन्नसेवेसाठी



महत्वाचा ठरत आहे. याही वर्षी म्हणजे २७ व्या वर्षी आज हा धान्याचा चाकरवाडीकडे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत रवाना करण्यात आला.

सदर ट्रक रवाना होण्यापूर्वी माजी आमदार वैजनाथ शिंदे व सभापती जगदीश बावणे, व्यापारी अशोक अग्रवाल, बालाप्रसाद बिदादा, संचालक अनिल पाटील, युवराज जाधव, अनंत पवार, श्रीनिवास शेळके, बालाजी वाघमारे, शिवाजी कांबळे यांच्यासह सुधीर गोजमगुंडे, अशोक लोया, अमर पवार, तुळशीदास गंभीरे, रमेश सूर्यवंशी, सुरेश मालू, निवृत्ती ढवळे, गुलाब मोहिते यांची उपस्थिती होती.

रवाना झालेल्या या धान्याच्या ट्रकमध्ये १०२ तेल डब्बे, साखरेचे २३ पोते, गव्हाचे १७६ कट्टे, हरभरा डाळीचे ६२ कट्टे, तूर डाळीचे ७ कट्टे, एक मीठाचे पोते व चिंचेचा कट्टा या जिन्नसांचा समावेश होता. चाकरवाडी येथे होत असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहास या धान्याच्या माध्यमातून अन्नसेवेत महत्वाचे योगदान प्राप्त होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानोबा साखरे, सुधीर बोरुळे, संजय माने, बालाजी जाधव, डिगंबर माळवदे, व्यंकट शिंदे, नवनाथ कवितगे, श्रीराम गायकवाड, सुरेश देशमुख, जयकुमार गोरे आदींसह बाजार समितीतील विविध घटकांनी योगदान दिले होते.

## मोहर्रम निमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** आनंद नगर काझी मोहल्ला येथे मोहर्रमनिमित्त चिश्तिया सरकार मोहर्रम कमिटीच्या वतीने दि. २४जून रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले या रक्तदान शिबीरात २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी आनंदनगर येथील नगरसेवक सचिन गायकवाड, आसिफ बागवान, उमर दरास खान, हमीद शेख, सद्दाम पठाण, साजिद शेख, मोबीन पटेल, शेख गौस, तांबोळी शकील, तांबोळी इरफान, इरफान शेख, वाजिद शेख, रहमान शेख, ताजू पठाण, युसुफ शेख, आदी मान्यवर उपस्थित होते या मोहरम निमित्त शालेय विद्यार्थ्यांना वह्या पुस्तकांचे वाटप, शरबत प्रसाद वाटप आधीचा रक्तदान शिबिर असे विविध सामाजिक उपक्रम करून हा मोहर्रम मुस्लिम युवकांनी साजरा केला.

## वाढदिवशीच दिग्गज क्रिकेटपटूचं निधन

**मुंबई/प्रतिनिधी :**न्यूझीलंडचे माजी वेगवान गोलंदाज बॉब ब्लेअर यांचं इंग्लंडमध्ये निधन झालं आहे. आपल्या ९४ व्या वाढदिवशी निधन पावलेले ब्लेअर हे केवळ एक क्रिकेटपटूच नव्हते, तर धैर्य, संघर्ष आणि खिलाडूवृत्तीचे प्रतीक होते. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डानं ब्लेअर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांच्या स्मरणार्थ, न्यूझीलंड संघ नॉटिंगहॅम इथं इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी हातावर काळी पट्टी बांधणार आहे.

१९५२ ते १९६४ दरम्यान न्यूझीलंडसाठी १९ कसोटी सामने खेळलेल्या ब्लेअर यांनी ४३ बळी घेतले. देशांतर्गत क्रिकेटमधील त्यांची कामगिरी तर त्याहूनही प्रभावी होती, जिथं त्यांनी ५९ प्रथम-श्रेणी सामन्यांमध्ये ३३० बळी घेतले. १९५६-५७ चा हंगाम त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात संस्मरणीय ठरला, जेव्हा त्यांनी केवळ ९ च्या सरासरीनं ४६ बळी घेतले आणि दोनदा एका डावात नऊ बळी घेण्याचा पराक्रम केला.

एका अपघातानं बदललं आयुष्य : क्रिकेटच्या इतिहासात ब्लेअरला केवळ त्याच्या कामगिरीसाठीच नव्हे, तर १९५३ च्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यात त्यानं दाखवलेल्या अविश्वसनीय धैर्यासाठीही ओळखलं जातं. एलिस पार्कवर दुसरा कसोटी सामना खेळला जात होता. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी २१ वर्षीय ब्लेअरला दु:खद बातमी मिळाली की, नाताळच्या पूर्वसंध्येला झालेल्या तांगिवाई रेल्वे अपघातात त्याची होणारी पत्नी, नेरिसा लव्ह, बळी पडली होती. या अपघातात एकूण १५१ लोकांचा मृत्यू झाला होता. आपल्या वैयक्तिक आयुष्यातील सर्वात कठीण क्षणी, ब्लेअर टीम हॉटेलमध्ये दु:खी होता, पण जेव्हा न्यूझीलंड संघ अडचणीत होता आणि शेवटची विकेट हातात होती, तेव्हा त्यानं मैदानावर परतण्याचा निर्णय घेतला.

## मुंबईत सर्वाधिक पाऊस परळमध्ये, २३ तासांत ३२८ मिमी पावसाची नोंद

**मुंबई/प्रतिनिधी :** अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर मुंबईत पावसाचे आगमन झाल्याने मुंबईकरांना गारवा अनुभवायला मिळत आहे. मंगळवारी रात्रीपासून वाढलेला पावसाचा जोर आता काहीसा कमी झाला असला तरी अनेक भाग जलमय झाल्याने वाहतुकीवर परिणाम झाल्याचे चित्र आहे. दरम्यान, मंगळवार, सकाळी ८ ते बुधवार, सकाळी ७ या २३ तासांच्या कालावधीत परळमध्ये सर्वाधिक पावसाची नोंद झाली. महापालिकेच्या स्वयंचलित पर्जन्यमापकानुसार, परळमध्ये २३ तासांत सुमारे ३२८ मिमी पाऊस नोंदला गेला.मुंबईत मंगळवारी सुरू झालेल्या पावसाचा जोर रात्री वाढला. मुसळधारांमुळे पूर्व तसेच पश्चिम उपनगरातील अनेक सखल भागात पाणी साचले असून त्याचा परिमाण वाहतुकीवर झाला आहे.

पाण्याचा निचरा जलद गतीने होण्यासाठी महानगरपालिकेचे कर्मचारी कार्यस्थळी दाखल झाले आहेत. महापालिकेच्या स्वयंचलित पर्जन्यमापकानुसार, परळमध्ये मंगळवार, सकाळी ८ ते बुधवार, सकाळी ७ या २३ तासांच्या कालावधीत ३२८ मिमी पावसाची नोंद झाली. तसेच, मालवणी अग्निशमन केंद्र येथे ३३४ मिमी, एमसीएमसीआर पवई येथे २९६ मिमी, मालाड डेपो येथे २८९ मिमी, चारकोप महापालिका शाळा परिसरात २८१ मिमी , पालिकेच्या पी एन विभाग कार्यालय परिसर व कांदिवली अग्निशमन दल परिसरात २६५ मिमी पाऊस नोंदला गेला. विक्रोळी अग्निशमन केंद्र परिसरात सर्वात कमी म्हणजेच २०२ मिमी पावसाची नोंद झाली.

मंगळवारी रात्री झालेल्या मुसळधारांमुळे अंधेरी भुयारी मार्ग, शीव, विक्रोळी मेट्रो स्टेशन परिसर, किंग सर्कल परिसर, दादर, वडाळा, कुर्ला (एलबीएस मार्ग) आदी पाण्याखाली गेले. बुधवारी सकाळीही अनेक भागातील पाण्याचा निचरा झाला नसल्याने शाळकरी मुळे, नोकरदार यांना पाण्यातून वाट काढत इच्छित स्थळ गाठावे लागले.

दरम्यान, मालाड सबवे (दिंडोशी) जलमय झाल्याने तेथील वाहतूक बंद करण्यात आली होती. मात्र, पावसाचा जोर कमी झाल्यानंतर तेथील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात आली आहे.

## राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचे लातूरमध्ये रविवारी भव्य आगमन

**लातूर/प्रतिनिधी :** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन व राज्य गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा' महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचा दौरा पूर्ण करून रविवार, दि. २८ जून रोजी सकाळी १०.३० वाजता लातूर येथील पीव्हीआर टॉकीजजवळील उत्सव हॉटेल येथे आगमन करणार आहे. गोसंवर्धन, गोसंरक्षण व गोसेवेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे.

या संवाद यात्रेद्वारे गोसेवक, गोरक्षक, गोपालक, शेतकरी तसेच गोशाळा पदाधिकाऱ्यांना गोजनजागरण, गोसुरक्षा, गोसन्मान आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच गोसंवर्धन क्षेत्रातील विविध अडचणी, समस्या व सूचना जाणून घेऊन त्यावर चर्चा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी नुकतीच जैन गोरक्षण, लातूर येथे बैठक पार पडली. कार्यक्रम यशस्वी व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून तयारीचा आढावा घेण्यात आला.या यात्रेबद्दल गोप्रेमी मध्ये प्रचंड उत्साह आहे. या मुख्य सोहळ्यास महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. शेखर मुंदडा, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, सॅनरिच ॲकवाचे प्रमोद मुंदडा तसेच वृंदावनचे गोभक्त बालकृष्ण महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

याशिवाय जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्तेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल मीना यांनाही उपस्थित राहण्याबाबत निमंत्रण देण्यात आले आहे. संवाद यात्रेच्या स्वागतासाठी जिल्ह्यात जय्यत तयारी सुरू असून यात्रेच्या आगमनानिमित्त भव्य गोदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व गोभक्त, गोप्रेमी, गोरक्षक, गोपालक, शेतकरी व गोशाळा पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने नीलकंठ महाराज, शरद डूंगरवाल, वैभव शहा, सत्यनारायण सोनी, किरण ब्रह्मेचा, अजय गंभीर, पोलीस मित्र सुरेश करणावट तसेच जिल्ह्यातील विविध गोशाळांच्या संचालकांनी केले आहे. अशी माहिती समितीचे प्रसिद्धीप्रमुख राजेश डूंगरवाल यांनी दिली.

## सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांना दीप्ती पिंपरे लिखित स्वप्नांची भरारी पुस्तक भेट; दिलीपराव देशमुख यांनी दीप्ती पिंपरे हीचे केले कौतुक

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील दयानंद महाविद्यालयात बी.एस्सी.चे शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी दीप्ती दिलीप पिंपरे हिने अगदी कमी वयात प्रकाशित केलेल्या 'स्वप्नांची भरारी' या काव्यसंग्रहामुळे साहित्य क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिच्या या साहित्यिक कामगिरीची दखल घेत राज्याचे माजी मंत्री सहकारमहर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या आशियाना निवासस्थानी दीप्ती यांनी दिलीपराव देशमुख साहेब यांची भेट घेतली व पुस्तक भेट दिले यावेळी आदरणीय दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते दीप्ती पिंपरे यांचा सत्कार केला.

यावेळी दिलीपराव देशमुख यांनी दीप्तीच्या साहित्यिक वाटचालीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच कवयित्री शांता शेळके,डॉ. हरिवंशराय बच्चन यांसारख्या



महान साहित्यिकांचा आदर्श समोर ठेवून सातत्याने लेखन करत राहण्याचा सल्लाही दिला. आपण कविता वाचू शकतो पण लिहू शकत नाही.कविता लिहिण्यासाठी प्रतिभा असावी लागते आणि प्रतिभा या मुलीमध्ये आहे.

'स्वप्नांची भरारी' या काव्यसंग्रहात समाजातील वास्तव,जीवनातील विविध पैलू आणि प्रेरणादायी विचार प्रभावी शब्दांत मांडण्यात आल्याचे सांगत त्यांनी पुस्तकाचे विशेष कौतुक केले.विशेष म्हणजे, स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्यावर दीप्तीने लिहिलेल्या कवितेचे वाचन करतानाचा व्हिडिओ दिलीपराव देशमुख यांनी पाहिला.कवितेतील भावना आणि शब्दांची मांडणी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी विलास सहकारी साखर कारखान्याचे संचालक रमेशजी देशमुख, बोरगाव सोसायटीचे चेअरमन सतीश काळे,माजी चेअरमन दीपक काळे,पत्रकार बाबासाहेब काळे,विशाल देशमुख, चंद्रकांत पिंपरे, दिलीप पिंपरे,सतीश पिंपरे आदी उपस्थित होते.

धीरजभैयायांच्याकडूनदीप्तीचेकौतुक लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज भैय्या देशमुख यांचीही भेट घेऊन त्यांना 'स्वप्नांची भरारी' हा काव्यसंग्रह भेट दिला. धीरज भैय्या देशमुख यांनीही दीप्तीच्या साहित्यिक प्रतिभेचे कौतुक करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या एका कार्यक्रमात दीप्तीने स्व.विलासराव देशमुख यांच्यावरील कवितेचे वाचन केले होते.त्यावेळी प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून दाद देत घोषणांचा पाऊस पाडला होता. त्याचा व्हिडिओ मोठ्याप्रमाणात सोशल मीडियावर व्हाईरल झाला होता.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने कमी वयात साहित्य क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी ट्रेण्टीवन शुगर्सचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष संतोष देशमुख,पंचायत समितीचे उपसभापती महेश चव्हाण,डॉ.दिनेश नवगिरे, संजय ओव्हळ आदी मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.